## विकास आयुक्त (असंघटित कामगार) यांचे कार्यालय

## टिपणी

**महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ, मुंबई.**

• **स्थापना :** महाराष्ट्र घरेलू कामगार अधिनियम २००८ च्या कलम ३ अंतर्गत राज्यस्तरीय घरेलू कामगार कल्याण मंडळ दिनांक १२.८.२०११ रोजी स्थापन करण्यात आले असून दिनांक २७.०३.२०१५ रोजीच्या अधिसूचनेव्दारे मा. विकास आयुक्त (असंघटित कामगार) , महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची एक सदस्य मंडळ या नात्याने नियुक्ती झालेली आहे.

• **घरेलू कामगारांची नोंदणी :**
उपरोक्त अधिनियमाच्या कलम ११ नुसार वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या परंतु ६० वर्षे पूर्ण न झालेल्या घरेलू कामगारांची लाभार्थी म्हणून दिनांक १४ नोव्हेंबर, २०११ पासून नोंदणी करण्यात येत आहे. सदर नोंदणी ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने करण्यात येत आहे. घरेलू कामगार नोंदणीकरीता अर्जदाराने १) विहित नमुना फॉर्म च व छ २) वयाचा पुरावा (जन्माचा दाखला , शाळा सोडल्याचा दाखला , आधार कार्ड, भारत निवडणूक आयोगाने दिलेले ओळखपत्र , रेशनकार्ड, बँक पासबुक , यापैकी कोणतेही कागदपत्र नसल्यास सक्षम वैदयकीय अधिका-याचा दाखला) ३) वास्तव्याचा पुरावा, ४) फोटो (३) ५) घर मालकाचे प्रमाणपत्र अथवा घर कामगार असल्याबाबत नोटरीसमोर केलेले स्वयंघोषित प्रतिज्ञापत्र इत्यादी कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर नोंदणी करणेकरीता कामगार आयुक्त कार्यालयाच्या अधिनस्त जिल्हा कार्यालयातील दुकाने निरीक्षक तसेच सरकारी कामगार अधिकारी यांना नोंदणी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे. महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळातील एकूण नोंदणी संख्या ५,३९,८४८ इतकी असून डिसेंबर २०२४ अखेर जिवीत नोंदणी संख्या ७२,७४७ आहे.

• **नोंदणी फी व मासिक अंशदान :** मंडळामार्फत सर्वप्रथम घरेलू कामगारांकडून प्रत्येकी रु. ३०/- नोंदणी फी व रु.५/- मासिक अंशदान याप्रमाणे वार्षिक ६०/- अशी एकूण ९०/-रुपये जमा करावे लागत असे.

• तथापि शासन निर्णय क्र.:- घरेलू- १२२४/प्र.क्र. १५/ काम-७अ, दिनांक ०५.०२.२०२४ अन्वये घरेलू कामगारांकडून नोंदणीसाठी असलेल्या रु. ३०/- ऐवजी रु. १/- तसेच अंशदानाची रक्कम रु. ५/- ऐवजी रु.१/- अंशदान दरमहा जमा करावयाचे असून विहित नमुन्यात नोंदणीसाठी घरेलू कामगाराने अर्ज करावयाचा आहे. सदर अर्जाची क्षेत्रीय सरकारी कामगार अधिकारी यांच्यामार्फत छाननी केली जाते व त्यानंतर फी भरुन घरेलू कामगार नोंदीत होतात. ही नोंदणी एक वर्षाकरिता जिवित राहते.

• **मंडळातर्फे देण्यात येणारे लाभ :**

**१. अंत्यविधी सहाय्य:** मृत घरेलू कामगाराच्या कायदेशिर वारसास अंत्यविधी सहाय्य रु. २,०००/- देण्यात येते.

**२. प्रसुती लाभ:** घरेलू कामगार मंडळाच्या दि. २८.०९.२०१२ च्या बैठकीत घरेलू कामगारांना प्रसुतीलाभ देण्याबाबत ठराव करण्यात आला असून त्याअंतर्गत घरेलू कामगारास दोन अपत्यापर्यंत प्रत्येक प्रसुतीकरीता रु.५,०००/- इतकी मदत देण्यात येते.

**३. सन्मानधन योजना :** शासन निर्णय क्र.-घरेलु- १२२२/प्र.क्र. १६५/काम-७अ, दि. ०६.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळातर्फे प्रतिवर्षी दिनांक ३१ डिसेंबर रोजी वयाची ५५ वर्ष पूर्ण केलेल्या जिवित नोंदणी असलेल्या पात्र घरेलू कामगारांना महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाच्या निधीतून सन्मानधन योजनेंतर्गत रु. १०,०००/- एवढी रक्कम थेट कामगारांच्या बँक खात्यात जमा करण्यात येत आहेत.

**४. संसार उपयोगी भांडी भेटवस्तू वाटप :** शासन निर्णय क्रमांक घरेलू- १२२४/प्र.क्र.२/कामगार-७अ, दि.२२.०२.२०२४ अन्वये सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ अधिनियम २००८, या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे , तसेच महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळामार्फत घरेलू कामगारांची नोंदणी / नुतणीकरण वाढवणे , या अनुषंगाने योजना राबविण्यासाठी घरेलू कामगार लाभार्थी दिनांक ३१.०७.२०२४ पूर्वी प्रत्यक्ष सक्रीय / जिवीत नोंदणीकृत असलेल्या १५,३८५ घरेलू कामगारांना डिसेंबर २०२४ अखेरपर्यंत संसार उपयोगी भांडी संचांचा वाटप करण्यात आलेला आहे.